९१

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीवरील अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालासाठी प्रतिवेदन, पुनर्विलोकन व स्वीकृती अधिकारी निश्चित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र. रागांयो-२०१३/प्र.क्र. २९३/आरोग्य-६
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ ,
दिनांक :- २५ सप्टेंबर, २०१३

59.26
26/9/10

**प्रस्तावना:-** राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. सदर सोसायटीवर नियुक्त केलेल्या नियमित तसेच कंत्राटी तत्वावरील अन्य अधिकाऱ्यांच्या गोपनिय अहवालांचे प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी गठीत केलेल्या सोसायटीवर नियुक्त करण्यात आलेल्या अखिल भारतीय सेवा व राज्य शासकीय अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालांसाठी पुढीलप्रमाणे प्राधिकारी निश्चित करण्यात येत आहेत.

| अधिकाऱ्याचे पदनाम | अखिल भारतीय सेवेतील अधिकारी कार्यरत असल्यास | अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्या व्यतिरिक्त अन्य अधिकारी कार्यरत असल्यास |
|---|---|---|
| प्रतिवेदन अधिकारी | प्रभारी सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | प्रभारी सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग |
| पुनर्विलोकन अधिकारी | मुख्य सचिव | मुख्य सचिव |
| स्वीकृती अधिकारी | मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य | -- |

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासाठी वरीलप्रमाणे आणि सोसायटीमधील प्रतिनियुक्तीवरील इतर अधिकाऱ्यांच्या गोपनीय अभिलेखांकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी हे प्रतिवेदन अधिकारी असतील व प्रभारी सचिव, आरोग्य हे पुनर्विलोकन अधिकारी असतील.

HL

त्याचप्रमाणे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीमध्ये कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाचे सहामाही मुल्यमापन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय विभागास सादर करावे. सदर अहवालावरुन प्रशासकीय विभागाची सदर अधिकाऱ्याचे कामकाज समाधानकारक असल्याची खात्री झाल्यास सोसायटी त्यांची पुन्हा नियुक्ती करु शकेल.

RGJYCommitt...

सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संद २३४४/अमुस सेवा दि. ७.९.२०१३ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ.सं. फडतरे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय. मुंबई
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव -२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
सार्वजनिक आरोग्य विभाग (आस्थापना, सेवा-२ व सेवा-३), मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती.